फक्त सभासदांसाठी
वर्ष ४२वे, अंक १२वा ❊ एप्रिल २०२४

सभा : मंगळवारी संध्या. ७.०० वा.
SNDT महाविद्यापीठ, रोटरी हॉल,
कर्वे रोड, पुणे ३८

स्नेह सेवा
मैत्रेय चॅरिटेबल सोसायटी, पुणे

नोंदणी क्र. MAH /1528/06/Pune, दिनांक ७ सप्टेंबर २००६
पत्रव्यवहारासाठी पत्ता :
द्वारा-प्रबोध, १०७०, शुक्रवार पेठ, सुभाषनगर लेन नं. ६, पुणे ४११००२.
snehseva1981@gmail.com

❊ अध्यक्ष ❊
नीलिमा भडभडे
मो. ९७६७९१६५४०

❊ संपादक ❊
विजय राव
मो.९१५८८३८९८९

## नवीन अध्यक्षांचे मनोगत.

सप्रेम नमस्कार

नवीन कार्यकारिणीचे स्वागत आहे. स्नेहसेवेचे महत्त्वाचे उपक्रम सैनिक स्नेह आरोग्यसेवा व शैक्षणिक प्रकल्प हे आहेतच. या वर्षी नवीन प्रकल्प सुरू करायचे आहे.

आरोग्य सेवा या उपक्रमांतर्गत यावर्षी सर्वाइकल कॅन्सर प्रिव्हेन्शन साठी लसीकरण हा नवीन उपक्रम सुरू करण्याचे योजिले आहे. गेले वर्षभर याची चर्चा सुरू होती. एचपी व्ही या व्हायरसमुळे गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग होतो. तर सात मिनिटाला एका स्त्रीचा मृत्यू सर्वाइकल कॅन्सर या आजाराने होतो. लसीकरणामुळे हे प्रमाण नक्कीच कमी होईल.

सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया ने cervavac ही लस उत्पादन केली आहे. वय वर्षे नऊ ते तेरा वर्ष वयापर्यंत घेतल्यास दोन डोस, व वय चौदा ते सव्वीस वर्षपर्यंत घेतल्यास तीन डोस असे लसीकरण करावे लागते. यावर्षी कमीत कमी ३० मुलींचे लसीकरण करण्याचे ध्येय आहे.

हा उपक्रम चिन्मय मदर अँड चाइल्ड केअर यांच्या सहकार्याने जागतिक आरोग्य दिन ७ एप्रिल रोजी सुरू होणार आहे.

शैक्षणिक उपक्रमांतर्गत मराठी वाचन संस्कृती रुजवणे, गरजू मुलांची फी भरणे, व शैक्षणिक साहित्य पुरवणे, असे योजले आहे. ज्या मुलांना क्रमिक पुस्तके ही मिळवण्यासाठी धडपड करावी लागते अशा मुलांना गोष्टीची पुस्तके देणे व त्यांना वाचनाची गोडी निर्माण करणे हे उद्दिष्ट आहे. तळजाई वसाहतीतील मुला-मुलींची मध्ये उपक्रमाची सुरुवात होईल. वाचन मुलांचे भावविश्व समृद्ध करेल. 'Catch them young' ही स्लोगन प्रत्यक्षात आणूया.

.. **राधा संगमनेरकर**

## ‘घुबड’ पक्ष्याविषयी अंधश्रद्धा

या विषयावर डॉ. सतीश पांडे यांचे व्याख्यान (५ मार्च) रोजी झाले.

‘घुबड’ हा बहुतेक भारतीयांमध्ये ‘अपशकुनी’ म्हणून बदनाम झालेला पक्षी. हा पक्षी न आवडण्याचे मुख्य कारण म्हणजे याचे मोठे डोळे, याचा दोन कंपनमिश्रीत रात्रीच येणारा भयकारी घुत्कार असावा. परंतु युरोपमध्ये फ्रान्स वगैरे देशांत याला लक्ष्मीचे वाहन समजतात.त्याची पूजाही करतात. भारतातही काही राज्यांत याला शुभ मानतात.

घुबडाच्या अनेक जाती असून वैशिष्ट्यांप्रमाणे याला नावेही आहेत. प्रत्येक नावामागे त्याचे दिसणे, त्याचा आवाज, त्याचा आकार याप्रमाणे निरनिराळ्या प्रदेशात निरनिराळी नावे आहेत. नावांचे काही नमुने - हृदयाच्या आकाराच्या डोळ्यांचे ‘हृदीलोचन’, शिंगासारखे डोक्यावर पिसे असलेला ‘शिंगला’ किंवा ‘शृंगी घुबड व शंखासारख्या आवाजाचे ‘शंखध्वनी’. याचे रात्री जास्त फिरणे, स्मशानांजवळील वावर किंवा निवास, मोठे गरगरीत डोळे आणि बॉल अणि सॉकेट सांध्यातील मानेच्या रचनेमुळे २७० अंशामध्ये फिरणारे डोके यामुळे माणसाला त्याच्या भूताच्या कल्पनेत बसणारी प्रतिमा बऱ्यापैकी चपखल बसते आणि या पक्ष्याबद्दल भीती आणि किळस या भावना निर्माण झाल्या आहेत.

डॉ. पांडे यांनी घुबडाच्या बाबतीत अनेक प्रगत अभियांत्रिकी तंत्रज्ञानानेही शिकण्यासारख्या अचंबित करणाऱ्या गोष्टी सांगितल्या. त्याचे कान थोडे वर-खाली तसेच मागे-पुढेही असतात. त्यामुळे भक्ष्याच्या आवाजावरूनही त्याच्या ठिकाणाचे अचूक ज्ञान घुबडांना होते. डोळ्यांचा आकारही मोठा असल्याने कॅमेऱ्याचे ॲपर्चर मोठे केल्यास अंधारातही जसे दिसू शकते, तसेच घुबडांनाही रात्री स्पष्ट दिसते. पंखांची रचनाही अशी असते की उडताना अतिशय कमी आवाज येतो. त्यामुळे भक्ष्याच्या जवळ जाऊनही चाहूल लागत नाही. पंखांना मागच्या बाजूला कंगव्याप्रमाणे दाते असतात. त्यामुळे आवाज येत नाही. लक्ष्मी (संपत्ती) येताना किंवा जाताना आवाज करत नाही त्यामुळेच कदाचित लक्ष्मीचे वाहन म्हणत असावेत. याची

फुफ्फुसेही विशिष्ट रचनेची असतात. (Bi Broncheal Lungs) तसेच दोन स्वरयंत्रेही असतात. त्यामुळे वेगळा आवाज काढतात. तसेच पोटातील पाचक रस हे 5.5 pH असतात. त्यामुळे खाल्लेले छोटे प्राणीही पचवले जातात.

घुबडे शेतकऱ्याचे खरे मित्र असतात. पिकांवर येणारे किडे, कीटक तसेच रात्री पिकांचा फडशा पाडणारे उंदीर हे घुबडांचे खाद्य. डॉ. पांडे यांच्या व्याख्यानानंतर घुबडाची वाटणारी भीती खूपच कमी झाली.

**माधव बांदिवडेकर**

## वार्षिक सर्वसाधारण सभा :

मैत्रेय चॅरिटेबल सोसायटी आणि स्नेहसेवा २०२३-२४ च्या वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक १२ मार्च २०२४ रोजी रोटरी हॉल, एस.एन.डी.टी. विद्यापीठ, पुणे, येथे झाल्या.

**लेखा परीक्षा हिशेब व अहवाल :** २०२२-२३ वर्षाचे मैत्रेय चॅरिटेबल सोसायटीचे लेखापरीक्षा पूर्ण केलेले हिशेब लेखापरीक्षा-अहवालासह एस.आर.पंडित अँड कं. यांचेकडून प्राप्त झाले होते, ते सभेपुढे सादर केले. २०२३-२४ या वर्षाचे मैत्रेय चॅरिटेबल सोसायटी आणि स्नेहसेवाचे दि ११ मार्च २०२४ पर्यंतच्या जमा-खर्चाचे विवरण श्री अरविंद भडकमकर यांनी सादर केले आणि सर्व प्रश्नांची उत्तरे दिली.

**वर्ष २०२३-२४ मधील कार्याचा आढावा:** अध्यक्ष डॉ नीलिमा भडभडे यांनी मैत्रेय सोसायटीच्या संपूर्ण वर्षाचा आढावा सादर केला.

**मैत्रेय चॅरिटेबल सोसायटी:** सैनिकस्नेह प्रकल्पाखाली चितळे बंधू यांनी तयार केलेल्या मिठाईचे ७००० डबे सैनिकांना पाठविले. त्यापैकी ६५०० डबे पश्चिम, पूर्व आणि उत्तर सीमेवरील बटालियन यांचेकडे, आणि ५०० डबे खडकी येथील पॅराप्लेजिक सेंटर आणि क्वीन मेरी इन्स्टीट्यूट येथे दिले. प्रत्येक डब्याबरोबर पुण्यातील २२ शाळांमधील मुलांनी केलेली भेट कार्डे पाठवली. या प्रकल्पासाठी ११ लाख रुपये खर्च झाले. ही संपूर्ण रक्कम ऑगस्ट २०२३ नंतर मिळालेल्या देणग्यामधून गोळा झाली.

**आरोग्य प्रकल्प:** एम.व्ही.एम. सेमी इंग्लिश स्कूल, लॉ कॉलेज रस्ता येथील ४ ते ६ वर्षे वयोगटातील ७५ मुलांची आरोग्य तपासणी डॉ संगमनेरकर द्वय यांनी आणि त्यांच्या परिचित डॉक्टरांनी पूर्ण केली. हिंगणे खुर्द येथील श्री शिवछत्रपती प्रतिष्ठान च्या निवासी मतीमंद विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना लागणारी औषधे पुरविली. या मुलांच्या तपासणीचे काम डॉ अरुण निरंतर करतात आणि औषधे लिहून देतात.

**शैक्षणिक प्रकल्प:** एम.व्ही.एम. सेमी इंग्लिश स्कूल, लॉ कॉलेज रस्ता, येथील ४ ते ६ वर्षे वयोगटातील १३ मुलांची एकूण रु २६००० इतकी फी दिली. याच शाळेच्या ७५ मुलांबरोबर कोजागिरी आणि ख्रिसमस साजरे केले. मोरया शिक्षण संस्थेच्या एम.एस.एस. स्कूल चिंचवड येथील ३२ मुलांची फी रु. ८३००० दिली. याच शाळेत इ. ७वी च्या मुलांसाठी निबंध स्पर्धा घेतली आणि उत्तम निबंधासाठी तीन आणि उत्तम हस्ताक्षरासाठी तीन बक्षिसे दिली.

**सार्वजनिक व्याख्याने :** डॉ धनंजय वाखले, डॉ जया सागडे, डॉ स्नेहा गोरे-मेहेंदळे आणि डॉ संजय उपाध्ये यांची व्याख्याने आयोजित केली. वर्तमानपत्रातील जाहिरात वाचून अनेक जण भाषण ऐकण्यास आले होते.

**पेमेंट गेटवे:** देणग्या गोळा करणे सुलभ जावे त्यासाठी फोनपे चे पेमेंट गेटवे प्रणाली आपल्या वेब-साईट मार्फत जोडून घेतली आहे.

**मोबाईल:** मैत्रेय सोसायटी चे बँक व्यवहार, फोन-पे बरोबर व्यवहार, आयकर विषयक कार्यवाही आणि धर्मादाय आयुक्त यांचेकडील कार्यवाही सुलभ व्हावी यासाठी मैत्रेय सोसायटी साठी मोबाईल फोन विकत घेतला आहे आणि मोबाईल कनेक्शन घेतले आहे (नं: ८५३०२१५३००). तसेच याच कारणांसाठी नवे इमेल उघडले आहे: ssmaitreya.pune@gmail.com.

**स्नेहसेवा:** स्नेहसेवा तर्फे आरोग्य, मानसिक आरोग्य, प्रेरणा देणारी, मार्गदर्शन करणारी, प्राणी-पक्षी जगताविषयी, साहित्य, कायदा, संगीत, हवामान, या विषयांची अशी एकूण २९ व्याख्याने आयोजित केली. ६ संस्थांच्या भेटी आयोजित केल्या. गणेश उत्सवानिमित्त १ नाट्यप्रयोग सादर झाला. १२ कार्यक्रम सभासदांनी सादर केले. कान्हे फाटा येथील जगताप धबधब्यावर सहलीला जावून आलो.

सभासदांच्या सर्व १२ गटांनी आपापली जबाबदारी उत्तम पार पाडली. सौ शुभांगी भागवत यांनी सर्वे सभासदांची माहिती देवून वाढदिवसाच्या सदिच्छा whatsapp तर्फे पाठवल्या.

या वर्षी सभासदांना कार्यक्रमाचे निमंत्रण whatsapp आणि ई-मेल ने पाठवले. सभासदांची उपस्थिती अगोदर जाणून घेण्यासाठी whatsapp वर पोल ची पद्धत राबविली. अमर केटरिंग यांनी खान-पानाचे उत्तम व्यवस्था केली. स्नॅप-आर्टस् च्या सौ सुप्रिया जोगदेव यांनी रोस्टर आणि वार्तापत्र तयार करून दिले. एस.एन.डी.टी. च्या रोटरी हॉल मध्ये श्री संग्राम आणि सौ लक्ष्मीताई यांनी मदत केली.

**अंदाजपत्रक:** मैत्रेय चॅरिटेबल सोसायटचे २०२४-

२५ चे अंदाजपत्रक कार्यकारिणीने मंजूर करून मा. धर्मादाय आयुक्त यांचे दप्तरी सादर केले होते, ते खजिनदार श्री अरविंद भडकमकर यांनी सादर केले. अंदाजपत्रकाबद्दल चर्चा झाली. श्री भडकमकर यांनी सांगितले की सोसायटीने या वर्षी कार्यक्रमांसाठी हॉल साठी भाडे द्यावयाचे आहे ते, आणि प्रत्येक सभासदाने वार्षिक वर्गणी रु. १५०० द्यावयाची आहे, या दोन्ही गोष्टी अंदाजपत्रकात दाखवल्या आहेत.

स्नेहसेवाचे २०२४-२५ चे कार्यकारिणीने मंजूर केलेले अंदाजपत्रक सादर केले. अंदाजपत्रकाबद्दल चर्चा झाली. श्री श्याम भुर्के यांनी सुचविले की सभासद टिकून राहावेत यासाठी स्नेहसेवा ची वार्षिक वर्गणी रु १००० इतकीच असावी. त्यावर साधक बाधक चर्चा झाली. स्नेहसेवा च्या कार्यासाठीच्या सर्व खर्च यांबद्दलही चर्चा झाली. यास कोणी विरोध केला नाही. वर्गणी रु १००० असावी असे ठरले. आता सभासदांनी द्यावयाची वर्गणी ठरली ती अशी: मैत्रेय: रु १५००, स्नेहसेवा: रु १००० असे एकूण रु. २५००.

**२०२४-२५ वर्षासाठीच्या कार्यकारिणीची निवड:** निवडणूक अधिकारी श्री माधव बांदिवडेकर यांनी मैत्रेय चॅरिटेबल सोसायटीची आणि स्नेहसेवा ची वर्ष २०२४-२५ (१ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५) साठीची कार्यकारिणी जाहीर केली ती सभेने मंजूर केली.

(१) अध्यक्ष: डॉ. राधा संगमनेरकर

(२) सचिव: श्रीमती नीला सरपोतदार

(३) सहसचिव: श्रीमती रिताराणी शितोळे

(४) खजिनदार: सौ ऋचा सावरकर

(५) सभासद: श्री सुधीर पळसुले

(६) सभासद: श्रीमती छाया काळे

(७) सभासद: सौ सुनिता वाघ

(८) सभासद: डॉ नीलिमा भडभडे

**इतर विषय:** एस.आर.पंडित अँड कं यांना आर्थिक वर्ष२०२३-२४ करीता मैत्रेय चॅरिटेबल सोसायटीचे लेखापरीक्षक म्हणून नेमण्यात आणि त्यांची फी ठरवली. मैत्रेय चॅरिटेबल सोसायटी ची बँक खाती, फोनपे पेमेंट गेटवे आणि भारती एयरटेल मोबाईल फोन कोनेक्शन साठी अधिकार मंजूर करण्यात आले.

**..कौस्तुभ भडभडे**

## डेक्कन कॉलेजच्या पुरातत्त्व संग्रहालयास भेट

ता २३ मार्च रोजी आयोजित संस्थाभेट झाली. एकूण २५ सदस्य ह्या भेटीला आले होते. पुरातत्व विभागाच्या प्रमुख प्रोफेसर (डॉ ) शहीदा अन्सारी ह्यांनी ह्या भेटीस अनुमती दिली. ही भेट तीन विभागात होती .

विभाग अ) पुरातत्व संग्रहालयाच्या ८ विथीका. डॉ नीलम काळे (ढापरे) संग्रहालय व्यवस्थापक यांनी ह्या विथीकातील विविध प्रदर्शित वस्तू संदर्भात सखोल माहिती दिली. ह्या विथीकांची संक्षिप्त माहिती खालील प्रमाणे.

१) प्रा. ह. धी. सांकलिया स्मृती विथिका - प्रा. सांकलिया यांनी १९३९ पासून भारतात अनेक पुरातत्वीय स्थळांचा शोध लावला . त्यांना भारतातील पुरातत्व खात्याचे आद्य प्रवर्तक म्हटले जाते. त्यांच्या संशोधनाची सर्वांगीण माहिती येथे प्रदर्शित केली आहे. नेवासा येथील उत्खननावर आधारित अत्यंत महत्वाची प्रतिकृती येथे आहे. पाषाण युगा पासून मराठा मुस्लिम काळा पर्यंत पाच वेगवेगळ्या संस्कृतीचे अवशेष प्रदर्शित केले आहेत.

२) पाषाण युग विथिका - येथे इसपूर्व १७,००,००० ते इसपूर्व ५००० ह्या कालावधीतील दगडी हत्यारे प्रदर्शित केली आहेत. ह्या कालावधीचे ढोबळमानाने खालील विभाग आहेत.

आद्य पुराष्म युग इसपू १७,००,००० ते ईसपू २,००,००० वर्ष
मध्य पुराष्म युग इसपू २,००,००० ते ५०,००० वर्ष
उत्तर पुराष्म युग इसपू ४५,००० ते १२,००० वर्ष
मध्यास्म युग इसपू १२,००० ते ५,००० वर्ष

मानवाच्या प्रगतीनुसार पाषाण हत्यारांचा आकार लहान होत गेला उत्तर पुराष्म युगातील हत्याराना सूक्ष्मांस्त्र संबोधिले जाते तर मध्यास्म युगातील हत्यारानां क्षुद्रास्त्र संबोधितात .

ह्या विथिकेत भारताची प्रमाणबद्ध त्रिमितीय प्रतिकृती ठेवलेली आहे. ह्या प्रतिकृतीचं निर्माण आपले सदस्य श्री. विजय राव व त्यांचे वडील श्री के आर एस राव ह्यांनी केलं आहे. हे श्रेय निर्देश करणारी ताम्रपट्टिका प्रतिकृती वर आहे.

३) ताम्र पाषाण युग विथिका - येथे ईसपू ५,००० ते ईसपू ७०० ह्या कालावधीतील तांब्याची हत्यारे व औजारे आहेत. घर बांधणी, कुंभार कला याचे पुरावे आहेत.

४) लोह युग विथिका - ईसपू १२०० ते ईसपू ५००. ह्या काळात लोहाचा वापर हत्यारे आणि अवजारे करण्याकरीता केला, तसेच दळणवळणाकरीता घोड्याचा वापर होत असे.

५) आद्य इतिहास काळ विथिका - इसपू ३०० ते इसपू ५०० ह्या काळात शहर निर्मिती, रस्ते बांधणी, अलंकार व परदेशी संस्कृतीच्या भेटीच्या खुणा सापडतात .

६) कला व स्थापत्य विथिका - मंदिर स्थापत्य आणि मूर्तिशास्त्र संशोधनाचे कार्यानुषंगाने मूळ पाषाण शिल्पे आणि प्रसिद्ध शिल्पांच्या प्रतिकृती येथे आहेत

७) पुराभिलेख आणि नाणक शास्त्र विथिका - शिळा लेख, ताम्रपट, आणि प्राचीन नाणी येथे बघायला मिळतात.

८) वांशिक पुरातत्व विथिका - मध्य प्रदेश आणि महाराष्ट्र येथील आदिवासी वस्त्याच्या कडून गोळा केलेली हत्यारे, गृहोपयोगी वस्तू, मुर्ती, अलंकार, खेळणी व आयुधे येथे आहेत.

**विभाग ब )** लोकमान्य बाळ गंगाधर टिळक ह्यांचे वास्तव्य असलेली वसतीगृहाची खोली भेट.

ह्या भेटी दरम्यान संस्थेच्या ग्रंथालयाच्या प्रमुख डॉ. चौधरी ह्यांनी माहिती दिली.

**विभाग क )** मराठा इतिहास संग्रहालय - ह्याचे दोन विभाग आहेत.

१) अभिलेखागार-( पारसनीस कलेक्शन ) येथे इसपू १०० सालातील भूर्जपत्रावर लिखित ग्रंथ तसेच ८व्या -९ व्या शतकातील ताम्रपट राष्ट्रकूट, कदंब आणि चालुक्य राजवटीची माहिती देतात. १५०० सालातील आदिलशाह यांचे फर्मान व इतर मोडी भाषेतील आदेश, वतन पट्टे त्या कालातील माहिती देतात.

२) जमखिंडी संग्रह - येथे जमखिंडी संस्थानाने भेट दिलेले त्यांचे विविध वस्तूंचे संग्रह ठेवले आहेत. त्या काळातील विविध शस्त्रे, संगमरवर आणि चंदनातील कोरीव काम केलेल्या कला कृतींचा ह्यात समावेश आहे.

संग्रहालय प्रमुख श्री. अमित गेंडाम व माजी प्रमुख श्री मांडके ह्यांनी सविस्तर माहिती दिली. ह्या संस्था भेटीचे पूर्ण नियोजन आपले सदस्य श्री विजय राव ह्यांनी उत्तम प्रकारे केले. अल्पोपहाराच्या नियोजनात डॉ राधाताई संगमनेरकरांनी त्यांचा चालक व वाहन देऊन मदत केली.

**तुषार कसरेकर**

## बुद्धिमत्ता चाचणी...

२६ मार्च रोजी स्नेहसेवा मध्ये एक आगळा वेगळा कार्यक्रम श्री व सौ काळभोर ह्यांनी सादर केला.. कार्यक्रम होता बुद्धिमत्ता चाचणी...

श्री काळभोर हे Brilliants Academy चे संचालक, आयआयटी सारख्या परीक्षांचे classes पुण्यात घेणारे,आणि त्यांच्या सुविद्य पत्नी ची ही त्यात त्यांना साथ होती... स्पर्धा परीक्षेत कशा प्रकारचे प्रश्न विचारले जातात, सहज सोपे दिसणारे प्रश्न कसे अचानक आपल्याला चुकीच्या उत्तरा कडे नेतात, त्या प्रश्नावली तयार करण्यात मानस शास्त्रज्ञ सुद्धा असतात, झटपट आणि योग्य दिशेने, कॉमन सेन्स वापरून कशी उत्तरे द्यायला हवीत, ह्याचा एक वस्तुपाठ च आपल्या समोर त्यांनी मांडला

बुद्धिमत्ता, तर्क विश्लेषण करण्याची क्षमता, समय सूचकता आणि ह्या सर्वांचे मेंदूत रसायन तयार होऊन झटकन आणि योग्य पर्याय शोधणे असा थोडा गमतीचा,थोडा विचाराला चालना देणारा असा हा बुद्धीचाचणीचा एक वेगळा प्रयोग स्नेहसेवात केला आणि छान यशस्वी पण झाला.

परीक्षेत असावे तसे गंभीर वातावरण, आम्ही कॉपी करत नाही ना ह्याच्यावर बारीक लक्ष ठेवणारे मुख्याध्यापक, २५ मिनिटांची वेळ,आणि ३० प्रश्न...

आम्हाला KBC मुळे चार मधला एक पर्याय शोधायचा ह्याचे ज्ञान होतेच.

नंतर एकमेकांकडे प्रश्नपत्रिका देऊन त्याची तपासणी झाली आणि तुषार कसरेकर २५ मार्क मिळवून प्रथम क्रमांक,२३ मार्क आणि २१ मार्क मिळवून माधव बांदिवडेकर आणि कौस्तुभ भडभडे आणि २० मार्क मिळवून डॉ. राधा, असे बक्षीस वितरण झाले, नीला सरपोतदार, अश्विनी शिंदे आणि संध्या भडकमकर ह्यांना पहिल्यांदाच अशा प्रकारची परीक्षा दिल्याबद्दल प्रोत्साहन म्हणून पारितोषक दिले...

एकूण हा खेळ मस्त रंगला, उत्तरे जरी चुकली तरी खेळण्यातली मजा भरभरून घेतली...मला स्वत:ला खूपच मजा आली.

नंतर पौष्टिक लाडू, कसरेकर ह्यांनी घरी बनवलेलं सॅलड, पराठा चटणी आणि कॉफी असा भरगच्च मेनू सर्वांना आवडला....

पुन्हा अशा प्रकारचे खेळ खेळायला नक्कीच आवडेल.

**ऋचा सावरकर...**

## एप्रिल महिन्यातील वाढदिवस

## जीवेत् शरदः शतम्

| | |
|---|---|
| सौ. वंदना दांडेकर | १५ एप्रिल |
| डॉ. दिनेशकुमार पांडे | २१ एप्रिल |
| सौ. संध्या भडकमकर | २७ एप्रिल |
| डॉ. विद्या शर्मा | २८ एप्रिल |
| डॉ. मंगला घम | २९ एप्रिल |
| श्री. वसंत कुलकर्णी | २९ एप्रिल |